# विद्यार्थ्यांनी ध्येयाशी ठाम असले पाहिजे

## 'यूपीएससी'तील यशस्वी प्रथमेश राजेशिर्के; सावर्डेत सत्कार व मुलाखत

**सावर्डे : पुढारी वृत्तसेवा**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी कोणतेही ध्येय ठरवत असताना ते त्या ध्येयाशी ठाम असले पाहिजेत. येणाऱ्या अडथळ्यांना न डगमगता सकारात्मक दृष्टिकोन ठेवून सामोरे गेलो तरच आपण आपल्या ध्येयापर्यंत पोहोचू, असे यूपीएससी परीक्षेत देशात यश मिळविलेल्या प्रथमेश अरविंद राजेशिर्के याने सांगितले.



सावर्डे : यूपीएससी परीक्षेत यश मिळविलेल्या प्रथमेश राजेशिर्के याचा सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य तानाजी कांबळे.

देशपातळीवर यूपीएससी परीक्षेचा अंतिम निकाल नुकताच लागला. या परीक्षेमध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील मांडकी, ता. चिपळूण या अतिशय दुर्गम व ग्रामीण भागातील प्रथमेश अरविंद राजेशिर्के याने देशामध्ये २३७ व क्रमांक मिळवून घवघवीत यश संपादन केले. यामुळे रत्नागिरी जिल्ह्यातीलच नव्हे, तर देशभरामधील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आहे. या निमित्ताने सह्याद्री शिक्षण संस्थेच्या सावर्डे येथील कला व वाणिज्य महाविद्यालय प्रथमेशचा विशेष सत्कार व मुलाखतीचे नियोजन केले होते. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य तानाजी कांबळे यांनी प्रथमेशचा शाल व पुष्पगुच्छ देऊन त्याचे अभिनंदन केले. महाविद्यालयाचे प्राध्यापक संकेत कुरणे यांनी विशेष मुलाखत घेतली. या मुलखतीदरम्यान प्रथमेश म्हणाला की, यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण होण्याचे स्वप्न मी बारावीपासूनच बाळगले होते. बारावीनंतरच मी या परीक्षेला सुरुवात केली. त्यासाठी मी पुणे व दिल्ली येथे खासगी कोचिंग क्लास लावले. या परीक्षेबद्दलचा अनुभव सांगताना प्रथमेश म्हणाला की, सध्या देशभरामधील विद्यार्थी यूपीएससी व एमपीएससी या स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी १२ वी विज्ञानऐवजी कला शाखेला प्रथम प्राधान्य देतात आणि बरेच प्रशासकीय अधिकारी हे कला शाखेतून उत्तीर्ण झालेले आहेत. योग्य मार्गदर्शन, कठोर परिश्रम, सकारात्मक दृष्टिकोन आणि नियोजनपूर्वक अभ्यास यामुळेच मी ही परीक्षा उत्तीर्ण होऊ शकलो. यासाठी माझ्या कुटुंबाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुनील जावीर सर यांनी केले, तर आभार प्राचार्य तानाजी कांबळे यांनी मानले.

### वडिलांचे स्वप्न पूर्ण केले पण...

माझे वडील सैन्यात असल्यामुळे मी भावी प्रशासकीय अधिकारी व्हावे असे त्यांचे स्वप्न होते व ते मी पूर्ण केले; पण हे सत्यात उतरवलेले स्वप्न पाहण्यास ते हयात नाहीत. याचे मला मनोमनी दुःख वाटते, अशी भावना यावेळी प्रथमेशने व्यक्त केली.

# प्रथमेश राजेशिर्के याचा सावर्डे येथे विशेष सत्कार

**चिपळूण (प्रतिनिधी)**

नुकताच देशपातळीवर यु.पी.एस.सी परीक्षेचा अंतिम निकाल लागला या परीक्षेमध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील मांडकी ता.चिपळूण या अतिशय दुर्गम व ग्रामीण भागातील प्रथमेश अरविंद राजेशिर्के याने देशामध्ये २३७ व क्रमांक मिळवून घवघवीत यश संपादन केले. यामुळे रत्नागिरी जिल्ह्यातीलच नव्हे तर देशभरामधील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये नवीन आत्मविश्वास निर्माण झाला आहे. या निमित्ताने सह्याद्री शिक्षण संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय सावर्डे येथे विशेष सत्कार व मुलाखतीचे नियोजन करण्यात आले होते. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य तानाजी कांबळे यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन त्याचे अभिनंदन व कौतुक केले. महाविद्यालयाचे प्राध्यापक संकेत कुरणे यांनी विशेष मुलाखत घेतली.




या मुलाखती दरम्यान प्रथमेश म्हणाला की, युपीएससी परीक्षा उत्तीर्ण होण्याचे स्वप्न मी बारावीपासूनच ठरवले होते. बारावीनंतरच मी या परीक्षेला सुरुवात केली. त्यासाठी मी पुणे व दिल्ली येथे खासगी कोचिंग क्लास लावले. यावेळी त्याचा या परीक्षेबद्दलचा अनुभव सांगत असताना तो म्हणाला की सध्या देशभरामधील विद्यार्थी यु.पी. एस.सी व एमपीएससी या स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी १२ वी विज्ञान ऐवजी कला शाखेला प्रथम प्राधान्य देतात आणि बरेच प्रशासकीय अधिकारी हे कला या शाखेतून उत्तीर्ण झालेले आहेत. योग्य मार्गदर्शन, कठोर परिश्रम, सकारात्मक दृष्टिकोन आणि नियोजन पूर्वकअभ्यास यामुळेच मी ही परीक्षा उत्तीर्ण होऊ शकलो.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी कोणतेही ध्येय ठरवत असताना ते त्या ध्येयाशी ठाम असले पाहिजेत. येणाऱ्या अडथळ्यांना न डगमगता सकारात्मक दृष्टिकोन ठेऊन सामोरे गेले तरच आपण आपल्या ध्येयापर्यंत पोहोचू असेही तो म्हणाला. ही युपीएससी परीक्षा उत्तीर्ण होण्यामागे माझ्या कुटुंबाचे मोलाचे सहकार्य लाभले. माझे वडील सैन्यात असल्यामुळे मी भावी प्रशासकीय अधिकारी व्हावे, असे त्यांचे स्वप्न होते व ते मी पूर्ण केले पण हे सत्यात उतरवले. स्वप्न पाहण्यास ते हयात नाहीत याचे मला मनोमनी दुःख वाटते, अशी आपल्या पित्याबद्दल खंत प्रथमेशने या कार्यक्रमाच्या वेळी व्यक्त केली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुनील जावीर यांनी केले तर आभार प्राचार्य तानाजी कांबळे यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग व प्राध्यापकेत्तर सर्व कर्मचारी उपस्थित होते.

दैनिक
# आदर्श महाराष्ट्र

सोमवार १ मार्च २०२१ | आदर्श महाराष्ट्र

# रक्तदान शिबीर संपन्न !

चिपळूण (प्रतिनिधी) जिजाऊ ब्रिगेड, सावर्डा या सामाजिक, विधायक उपक्रम राबविणाऱ्या सेवा संस्थेच्या आणि कला व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने चिपळूण संगमेश्वर मतदार संघाचे विद्यमान आमदार शेखरजी निकम यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

रक्तदान शिबिराचा शुभारंभ आमदार शेखर निकम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी उपस्थितांना बहुमोल मार्गदर्शन केले. पर्कोटी लायन्स क्लबचे अध्यक्ष डॉ. कृष्णकला पाटील, माजी सभापती सौ. पूजाताई निकम, महेश महाडीक, सौ. वसुंधरा राजेशिर्के, सावर्डे सरपंच, उपसरपंच, सदस्य आदि मान्यवर उपस्थित होते. प्रामुख्याने, महाविद्यालयीन विद्यार्थी, जिजाऊ ब्रिगेडच्या महिला कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग घेऊन शिबीर यशस्वी केले.



जिजाऊ ब्रिगेड, सावर्डा या सामाजिक, विधायक उपक्रम राबविणाऱ्या सेवा संस्थेच्या आणि कला व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिराचे शुभारंभ करताना आमदार शेखरजी निकम, सोबत सौ. पूजाताई निकम, डॉ. दुर्लभा पाटील, जिजाऊ ब्रिगेडच्या कार्यकर्त्या दिसत आहेत.

पुढारी १३/१/२१



चिपळूण : सावर्डे महाविद्यालयात स्वामी विवेकानंद व राजामाता जिजाऊ जयंतीवेळी उपस्थित महिला.

# सावर्डेतील कला व विज्ञान महाविद्यालयात स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ जयंती

**चिपळूण** : जिजाऊ महिला ब्रिगेड, सावर्डे व कला व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी केली. यावेळी राजमाता जिजाऊ यांच्याविषयी जिजाऊ ब्रिगेडच्या अध्यक्ष रेणुका राजेशिर्के यांनी विचार मांडले. छत्रपती शिवाजी महाराजांची जी कारकीर्द घडली त्याच्या मागे जिजाऊंचे संघटन व विचार होते. आज जिजाऊंच्या संस्काराची गरज असून प्रत्येक स्त्रीने आपल्या मुलांसमोर आदर्श उभा करावा, असे सांगितले. प्रा. तानाजी कांबळे यांनी स्वामी विवेकानंद यांच्याविषयी विचार व्यक्त केले. तरुणांना चांगले शिक्षण आणि रोजगार उपलब्ध झाल्यास देश अजून आर्थिक बळकटी प्राप्त करेल. कोरोनाच्या कालखंडात मोठे काम तरुणांनी केले आणि करीत आहेत. हीच स्वामी विवेकानंदांना खरी आदरांजली ठरेल, असे सांगितले. अनुजा भोसले यांनी स्वागत केले. प्रा. दीप्ती शेंबेकर यांनी प्रास्ताविक, तर अरुणा घाडगे यांनी आभार मानले. कार्यक्रमास जिजाऊ ब्रिगेडच्या महिला व महाविद्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

# कला व विज्ञान महाविद्यालय सावर्डे येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**चिपळूण (प्रतिनिधी) :** कला व विज्ञान महाविद्यालय सावर्डे येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व सह्याद्री शिक्षण संस्थेचे कला व विज्ञान महाविद्यालय सावर्डे, गोविंदराव निकम कॉलेज ऑफ फार्मसी व सह्याद्री हॉटेल मॅनेजमेंट अँड टुरिझम सावर्डे, महिला विकास कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य याविषयी प्रा. शैलेंद्र सडोलीकर (महावीर महाविद्यालय कोल्हापूर) यांनी मार्गदर्शन केले. सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व समजून स्त्रीला 'चूल आणि मूल' याच्या बाहेर काढायचे असेल तर प्रत्येक कुटुंबात स्त्रीला शिक्षण मिळायला पाहिजे. शिक्षण मिळालेली स्त्री ही कुटुंबाचा आधार बनेल. त्याचबरोबर सामाजिक कार्यात भाग घेईल तेच काम खऱ्या अर्थाने सावित्रीबाईंनी कृतीत आणले. आंतरजातीय विवाह, बालविवाह, विवाह संस्था अशा अनेक मोहीमा त्यांनी समाजातील पुरुषांबरोबर स्त्रीलाही दिशा दाखवण्याचा प्रयत्न केला. या वेबिनारमध्ये २५० विद्यार्थी, विद्यार्थिनी व महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, प्राचार्य तानाजी कांबळे, प्राचार्य बत्तासे यांनी भाग घेतला होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. दिप्ती शेंबेकर यांनी तर स्वागत प्राचार्य अली यांनी केले. पाहुण्यांची ओळख प्रा. तानाजी कांबळे यांनी करून दिली तर आभार माया देसाई यांनी मानले

# कला व वाणिज्य महाविद्यालय सावर्डे येथे महिला दिन उत्साहात

▸ चिपळूण (प्रतिनिधी)

कला व वाणिज्य महाविद्यालय सावर्डे व 'महिला विकास कक्ष'यांच्या संयुक्त विद्यमाने ८ मार्च 'जागतिक महिला दिन' महाविद्यालयात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे माजी सभापती पूजा निकम व प्रमुख वक्ते म्हणून प्रा.डॉ.संगीता जामदार उपस्थित होत्या.



यावेळी पूजा निकम यांनी महिलांनी आपल्या हक्काबद्दल जागृत राहणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन केले तर प्रा.डॉ.संगीता जामदार महिला सक्षमीकरणाबद्दल बोलताना असे म्हणाल्या की, महिलांचा स्वातंत्र्याबरोबर जर त्यांचा आर्थिक पाया घट्ट झाला तर त्यांचे बरेच प्रश्न सुटतील. यासाठी महिलांनी शिक्षणाबरोबर काही कौशल्य आत्मसात करून जिथे रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. तेथे आपले स्थान बळकट करावे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य टी.वाय.कांबळे होते. त्याचबरोबर या कार्यक्रमाला प्रा.चवरे, प्रा.जावीर, प्रा.मोरे, प्रा.काजरोळकर व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.रंगाटे यांनी केले.



चिपळूण : प्लास्टिक कचरा व्यवस्थापन कार्यशाळेत मान्यवरांचे स्वागत करताना माजी सभापती पूजा निकम. सोबत सरपंच समीक्षा बागवे आदी.

# योग्य नियोजनातून प्लास्टिक प्रदूषण टाळता येईल : अ‍ॅड. शेट्टी

## सावर्डेत प्लास्टिक कचरा व्यवस्थापनबाबत कार्यशाळा

**सावर्डे : पुढारी वृत्तसेवा**

प्लास्टिक कचरा व्यवस्थापन ही काळाची गरज बनली आहे. प्लास्टिक कचरा उघड्यावर व कुठेही न टाकता प्लास्टिकपासून आपल्याला इतर उपयोगी वस्तू बनवता येतात. मानवाने प्लास्टिक कचऱ्याचे अयोग्य व्यवस्थापन केले तर ते मानवाला हानिकारक आहे. योग्य पद्धतीने व्यवस्थापन करून आपण प्रदूषण समस्येला आळा घालू शकतो, असे प्रतिपादन अ‍ॅड. निरंजनी शेट्टी यांनी केले. त्यामुळे प्लास्टिक कचऱ्याचे योग्य नियोजन झाले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

सावर्डेतील सह्याद्री शिक्षण संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालयात 'ग्रामीण भागातील प्लास्टिक कचरा व्यवस्थापन' या विषयावर कार्यशाळा पार पडली. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून अ‍ॅड. शेट्टी बोलत होत्या. हा कार्यक्रम रुरल कंजर्वेशन ऑर्गनायझेशन यांच्यावतीने आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन माजी सभापती पूजा निकम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अ‍ॅड. निरंजनी शेट्टी आणि सचिन ठिकेकर उपस्थित होते. प्राचार्य कांबळे यांनी पूजा निकम यांचे स्वागत केले. मनोगतामध्ये प्रमुख पाहुण्या अ‍ॅड. निरंजनी शेट्टी यांनी प्लास्टिक कचरा व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले. तसेच प्लास्टिक प्रदूषण टाळण्याबाबत करावयाच्या उपाययोजनांची माहिती दिली.

पूजा निकम म्हणाल्या की, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन ही प्रत्येकाची जबाबदारी असून ती प्रामाणिकपणे अंगीकारली पाहिजे. अभ्यासपूर्ण पद्धतीने आपण जर प्लास्टिकचे व्यवस्थापन केले तर आपल्याला त्याच्यापासून नक्कीच फायदा होऊ शकतो. महाविद्यालयाचे प्राचार्य टी. वाय. कांबळे म्हणाले की, लोकांमध्ये अजूनही जनजागृती होणे गरजेचे आहे. प्लास्टिकचा निचरा होणे गरजेचे आहे. माणसाबरोबर प्राणी, पक्षी यांचे अस्तित्व प्लास्टिकमुळे धोक्यात आले आहे. हा कार्यक्रम महिला विकास कक्षातर्फे यशस्वी करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. सुजल रंगाटे यांनी केले, तर प्रा. अनुष्का काजरोळकर यांनी आभार मानले.



चिपळूण : कला महाविद्यालय सावर्डेत पदवीदान समारंभात पदवी प्रदान करताना पूजा निकम.

# यशस्वी जीवनासाठी हवे कौशल्ययुक्त शिक्षण : पूजा निकम

**चिपळूण :** यशस्वी जीवनासाठी कौशल्ययुक्त शिक्षण महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन पूजा निकम यांनी सावर्डे येथे केले. कला महाविद्यालय सावर्डे येथे पदवीदान समारंभामध्ये प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. निकम म्हणाल्या, "आज कोरोनाचा कालखंड आपण अनुभवत आहोत. ऑनलाईन शिक्षण घेऊन आपण पुढचा टप्पा गाठण्याचा प्रयत्न करत आहोत, पण नोकरीसाठी लागणारी डिग्री महत्त्वाची आहेच, त्याचबरोबर ग्रामीण भागामध्ये अनेक छोटे-मोठे उद्योगाची गरज आहे. ते उद्योग सुरू करण्यासाठी किंवा त्यामध्ये काम करावयाचे असेल तर आपणाकडे जे कौशल्य आहे, त्या कौशल्याचा शिक्षणाच्या माध्यमातून अधिकाअधिक ज्ञान मिळवून स्वतः नोकरी तयार करा आणि इतरांनाही द्या, ही आज काळाची गरज आहे." या वेळी पूजा निकम यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी देण्यात आली. कार्यक्रमास सावर्डे ग्रामपंचायत सरपंच समीक्षा बागवे, सदस्य सावंत, प्राचार्य तानाजी कांबळे, प्राध्यापक जयसिंग चवरे व कर्मचारी वर्ग उपस्थित होते. आभार प्राध्यापक मेधा सावर्डेकर यांनी मानले.

पुढारी २०/१/२०२१

# निकम विद्यालयात रस्ता सुरक्षा वेबिनार

**चिपळूण :** सह्याद्री शिक्षण संस्थेचे कला व विज्ञान महाविद्यालय, गोविंदराव निकम कॉलेज ऑफ फार्मसी व राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे रस्ता सुरक्षेबाबत वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी निवृत्त पोलिस निरीक्षक रामकृष्ण परब यांनी मार्गदर्शन केले. देशभर दि. १८ जानेवारी ते १७ फेब्रवारी दरम्यान रस्ता सुरक्षा अभियान राबविले जात आहे. याच अनुषंगाने या वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परब म्हणाले की, भारतामधील तरुणांची संख्या जास्त असून आज दुचाकीचे प्रमाण वाढले आहे. तरुणांच्या डोक्यामध्ये गाडी वेगाने चालवण्याची एक वेगळीच हवा असल्याचे दिसून येते. तसेच व्यसनाधिनता, गाडीवर असताना मोबाईलचा वापर यामुळे अपघाती मृत्युचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे वेगाला आवर घालून अपघाताचे प्रमाण कमी करण्याची जबाबदारी आता तरूणांवर आहे. गाडीची कागदपत्रे, वाहन परवाना व हेल्मेट याचा वापर नेहमी करावा. रहदारीचे नियम सर्वांनीच पाळावेत, असे आवाहनही परब यांनी केले. यावेळी रस्ता सुरक्षा संबंधी शपथ घेण्यात आले. या वेबीनारमध्ये १२० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. तानाजी कांबळे यांनी करून दिली. सूत्रसंचलन प्रा. माया देसाई यांनी केले.

सकाळ ८/१/२०

# सावित्रीबाईंनी स्त्री-पुरुषांना दिशा देण्याचे काम केले

चिपळूण, ता. ८ : शिक्षण मिळालेली स्त्री ही कुटुंबाचा आधार बनेल त्याचबरोबर सामाजिक कार्यात भाग घेईल. तेच काम खऱ्या अर्थाने सावित्रीबाईंनी कृतीत आणले. आंतरजातीय विवाह, बालविवाह, विवाह संस्था, अशा अनेक गोष्टींतून त्यांनी समाजात पुरुषाबरोबर स्त्रीलाही दिशा देण्याचा प्रयत्न केला, असे प्रतिपादन प्राध्यापक शैलेंद्र सडोलीकर यांनी केले.

तालुक्यातील सावर्डे येथील कला व विज्ञान महाविद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती झाली. या निमित्ताने सह्याद्री शिक्षण संस्थेचे कला व विज्ञान महाविद्यालय सावर्डे, गोविंदराव निकम कॉलेज ऑफ फार्मसी व सह्याद्री हॉटेल मॅनेजमेंट अँड टुरिझम सावर्डे, महिला विकास कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यान झाले. सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याविषयी प्राध्यापक शैलेंद्र सडोलीकर म्हणाले,सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व समजून स्त्रीला 'चूल आणि मूल' याच्या बाहेर काढायचे असेल, तर प्रत्येक कुटुंबात स्त्रीला शिक्षण मिळायला पाहिजे. धुळीमध्ये अक्षरे गिरवून स्त्री शिक्षणाची सुरवात सावित्रीबाईंनी केली. आज स्त्रियांच्या हातात शिक्षणासाठी मोबाइल तंत्रज्ञान आले ते फक्त सावित्रीबाई फुले यांच्यामुळेच. या वेळी २५० विद्यार्थी, विद्यार्थिनी व प्रा. तानाजी कांबळे, प्रा. बत्तासे तसेच प्राध्यापक, कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला.

# ..म्हणूनच शिवछत्रपतींची कारकीर्द घडली : राजेशिर्के

सकाळ वृत्तसेवा

रत्नागिरी, ता. १२ : जिजाऊ शिवाजी महाराजांच्या एक आदर्श होत्या आणि म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांची कारकीर्द घडली. त्यांच्या पाठीमागे जिजाऊंचे संघटन व विचार होते, असे प्रतिपादन जिजाऊ ब्रिगेडच्या अध्यक्षा रेणुका राजेशिर्के यांनी केले.

जिजाऊ महिला ब्रिगेड सावर्डे व कला व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. यावेळी राजेशिर्के म्हणाल्या, आज संस्काराची गरज असून प्रत्येक स्त्रीने आपल्या मुलांसमोर आदर्श उभा केला पाहिजे. प्रा. तानाजी कांबळे यांनी स्वामी विवेकानंद यांच्याविषयी विचार मांडले. भारत हा तरुणांचा देश आहे. जर तरुणांच्या हाताला चांगले शिक्षण आणि रोजगार उपलब्ध झाला तर हा देश अजून आर्थिक बळकटी प्राप्त करेल. यासाठी रोजगाराच्या संधी आज उपलब्ध असून त्याचा शोध घ्यावा आणि स्वतःच्या पायावर उभे राहावे, असे सांगितले. प्रास्ताविक प्रा. दीप्ती शेंबेकर यांनी केले. कार्यक्रमास जिजाऊ ब्रिगेडच्या महिला व महाविद्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.



रत्नागिरी: राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीप्रसंगी अभिवादन करताना जिजाऊ महिला ब्रिगेडच्या कार्यकर्त्या.

# सावर्डे महाविद्यालयात वेबिनारला प्रतिसाद

**सावर्डे : पुढारी वृत्तसेवा**

सह्याद्री शिक्षण संस्थेच्या कला व विज्ञान महाविद्यालय सावर्डे येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. याला प्रतिसाद लाभला. गोविंदराव निकम कॉलेज ऑफ फार्मसी व सह्याद्री हॉटेल मॅनेजमेंट अँड टुरिझम सावर्डे, महिला विकास कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या विद्यमाने वेबिनार झाला. सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य याविषयी प्रा. शैलेंद्र सडोलीकर (कोल्हापूर) यांनी मार्गदर्शन केले. सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व समजून स्त्रीला चूल आणि मूल याच्या परिघाबाहेर काढायचे असेल तर प्रत्येक कुटुंबात स्त्रीला शिक्षण मिळायला पाहिजे. शिक्षण मिळालेली स्त्री ही कुटुंबाचा आधार बनेल. तेच काम खऱ्या अर्थाने सावित्रीबाईंनी कृतीत आणले, असे सडोलीकर म्हणाले. प्राचार्य तानाजी कांबळे, प्राचार्य बत्तासे यांनी यात भाग घेतला. प्रास्ताविक प्रा. दीप्ती शेंबेकर यांनी तर माया देसाई यांनी आभार मानले.

# सावर्डे येथे प्लास्टिक कचरा व्यवस्थापन कार्यशाळा

2/12/
17/11/2021



मान्यवरांचा सत्कार करताना माजी सभापती सौ. पूजाताई निकम.

**सावर्डे:** चिपळूण तालुक्यातील सावर्डे येथील सह्याद्री शिक्षण संस्थेच्या कला व वाणिज्य महाविद्यालयात ग्रामीण भागातील प्लास्टिक कचरा व्यवस्थापन या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम रुरल कन्झर्वेशन ऑर्गनायझेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा माजी पं.स. सभापती सौ. पूजाताई निकम यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती मीनाक्षी, अॅड. निरंजनी शेट्टी (आर.ई.सी.ओ.च्या प्रमुख) आणि सचिन ठिकेकर हे उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना अॅड. निरंजनी शेट्टी म्हणाल्या की, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन ही काळाची गरज बनलेली आहे. प्लास्टिक कचरा उघड्यावर व कुठेही न टाकता प्लास्टिकपासून आपल्याला इतर उपयोगी वस्तू बनवता येतात. अध्यक्षीय मनोगतामध्ये सौ. पूजाताई निकम यांनी प्लास्टिक कचरा व्यवस्थापन ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे सांगितले. याबरोबरच महाविद्यालयाचे प्राचार्य टी. वाय. कांबळे यांनीही मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा. सुजल रगाटे यांनी तर आभार प्रा. कवजरोळकर यांनी मानले.



चिपळूण : कार्यशाळेत मान्यवरांचा सत्कार करताना माजी सभापती पूजा निकम.

# सावर्डेत प्लास्टिक कचऱ्यावर कार्यशाळा

**चिपळूण:** प्लास्टिक कचरा व्यवस्थापन ही प्रत्येकाची जबाबदारी असून, ती प्रामाणिकपणे अंगीकारली पाहिजे. अभ्यासपूर्ण पद्धतीने जर प्लास्टिकचे व्यवस्थापन केले तर आपल्याला त्याच्यापासून नक्कीच फायदा होऊ शकतो. यासाठी लोकांमध्ये अजून जनजागृती गरजेची आहे. प्लास्टिकचा निचरा होणे आवश्यक आहे. प्लास्टिकमुळे माणसाबरोबर प्राणी व पशु-पक्ष्यांचे जीवन धोक्यात आले असल्याचे मत माजी सभापती पूजा निकम यांनी व्यक्त केले. सावर्डेतील सह्याद्री शिक्षण संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालयात "ग्रामीण भागातील प्लास्टिक कचरा व्यवस्थापन" याबर एकदिवसीय कार्यशाळा झाली. स्वल कंजर्वेशन ऑर्गनायझेश । यांच्या वतीने हा कार्यक्रम झाला. ॲड. निरंजनी शेट्टी आणि सचिन ठिकेकर यांनी मार्गदर्शन केले.